## <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्ग</u>

### <u>क्रेनेक्स - आयएफई" मेट्रो-३ च्या १३ स्थानकांच्या उद्वाहक (लिफ्ट्स) यंत्रणेची उभारणी करणार</u>

**११ फेब्रुवारी २०१९:** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ)अंतर्गत आरे डेपो ते दादर आणि ओसीसी बिल्डिंगदरम्यान एकूण १३ स्थानकांमध्ये उद्वाहक (लिफ्ट्स) यंत्रणा उभारण्यासाठी "क्रेनेक्स अँड आयएफई" या समूहाची निवड करण्यात आली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली आहे

"क्रेनेक्स अँड आयएफई" हे कंत्राटदार मेट्रो-३ च्या १३ स्थानके आणि ओसीसी बिल्डिंगच्या एकूण ७६ उद्वाहक (लिफ्ट्सचे) आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग अशा प्रकारची कामे करणार आहेत. सर्वात जास्त प्रमाणात प्रवासी वाहून नेण्याची क्षमता, ऊर्जाबचत करणारे रिजनॅरेटिव्ह ड्राइव्ह, वेब बेस्ड रियल टाइम मॉनिटरिंग आणि रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याची संरचना करण्याकरता वापरली जाणार आहे.

याप्रसंगी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, "सर्वोत्तम उद्वाहक (लिफ्ट्स) यंत्रणा ही मेट्रो-३ साठी अत्यंत महत्वाची यंत्रणा असून याद्वारे प्रवाशांना सर्वोत्तम आरामदायी सुविधा उपलब्ध होणार आहेत. मेट्रो-३ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी अत्याधुनिक उद्वाहक यंत्रणेची उभारणी करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत"